कार्यालय नगर परिषद सिंदी (रेल्वे) ,जिल्हा – वर्धा

nagarparishadsindi@gmail.com

Telephone no-04155-266668

क्र नपसिं/नरवि/स.क्रं.४८/कावि१०५२ /२०२०

दिनांक- ०८/१०/२०२०

प्रति,

श्रीमती गंगाबाई हरिरामजी कलोडे,

रा. वार्ड क्रं १६, सिंदी रेल्वे, जि. वर्धा.

विषय :- मौजा सिंदी रेल्वे,सर्व्हे क्रं ४८ मधील प्लॉट क्रं २१,२२,२३,२४ एकूण आराजी ७०९.३६ चौ.मी. आपणाकडे तारण असलेले प्लॉट मोकळे (Release)करून मिळणेबाबत.

संदर्भ :- १. कार्यालयीन आदेश क्रं नपसिं /नरवि/कावी-१२३६/२०१६ दिनांक ०६/१२/२०१६

२. आपले अर्ज क्रं १४६९ दिनांक०७/०९/२०२० अन्वये.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भिय आदेश क्रं १ मधील अट क्रं २४ व २५ अन्वये आपणास रस्ते,विद्युत,पिण्याचे पानी व सांडपाण्याची सुविधा या किमान नागरी सुविधा सदर अभिन्यास मध्ये उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे कळविण्यात आले होते, तसेच आपण संदर्भ क्रं २ अन्वये न.प. कार्यालयाला सर्व्हे क्रं ४८ मधील मंजूर ले-आऊटचे प्लॉट क्रं २१,२२,२३,२४ एकूण आराजी ७०९.३६ चौ.मी. तारण असलेले प्लॉट मोकळे (Release) करून मिळणेबाबत अर्ज केला आहे.

संदर्भिय आदेश क्रं १ मधील अट क्रं २४ व २५ अन्वये आपण रस्त्याचे खडीकरण, सांडपाण्याच्या नाल्या, खुल्या जागेचे कुंपण व विद्युत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत परंतू पिण्याच्या पाण्याची लाईन टाकण्यात आली नाही तसेच खुल्या जागेत व रस्त्याच्या कडेला समाधानकारक वृक्ष लागवड करण्यात आली नाही, करिता आपले प्लॉट क्रं २१ व २२ एकूण आराजी ३५८.५७ चौ.मी. मोकळे करण्यात येत असून प्लॉट क्रं २३ व २४ एकूण आराजी ३५०.७९ चौ.मी. न.प. कडे गहाण ठेवण्यात येत आहे. तरी ६ महिन्यात वरील विकास कामे पूर्ण करून तसा अहवाल न.प. कडे सादर करण्यात यावा.

8.10.2020

मुख्याधिकारी

नगर परिषद सिंदी

प्रतिलिपी:- मा. दुय्यम निबंधक,सेलू.

महोदय,

आपणास या पत्रान्वये कळविण्यात येते की स.क्रं. ४८ मधील मंजूर ले-आऊटचे प्लॉट क्रं २१ व २२ च्या विक्रीचे आदेश काडण्यास न.प. ला हरकत नाही परंतू प्लॉट क्रं २३ व २४ ची विक्री न.प. चे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्या शिवाय करू नये.

मुख्याधिकारी

नगर परिषद सिंदी